# रक्तविहीन राज्यक्रांती इंग्लंड -१६८८

## प्रास्ताविक

या प्रकरणात आपणास १७ व्या शतकात आलेल्या वैभवशाली क्रांतीचा अभ्यास करावयाचा आहे. क्रांतीचा अभ्यास करण्यापूर्वी इंग्लंडचा पूर्वइतिहास पाहणे गरजेचे आहे. इंग्लंड या देशाला लोकशाहीची जननी म्हणून ओळखले जाते. लोकशाहीचा उदय प्रथम याच देशात झाला. इंग्लंड या देशावर रोमन लोकांनी पहिल्या शतकात राजकीय वर्चस्व निर्माण केले. सुमारे पाचशे वर्षे रोमन लोकांनी इंग्लंडवर वर्चस्व प्राप्त केले. नंतर रोमन साम्राज्याच्या ऱ्हासास सुरुवात झाली. त्यानंतर अँग्लो-सॅक्शन, ज्यूटस् जर्मन यांनी इंग्लंडवर वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांनी हळूहळू आपापली राज्ये स्थापन केली. कालांतराने सर्व एकत्र आले आणि एकसंघ इंग्लंड निर्माण झाले. या काळात इंग्लंडमध्ये काही चांगल्या परंपरा निर्माण झाल्या. या परंपरांची माहिती घेतल्यास आपणास वैभवशाली राज्यक्रांतीची पार्श्वभूमी लक्षात येईल आपसात भांडणाऱ्या पराक्रमी, कर्तबगार, धाडसी पुरुषाला राजेपद प्राप्त झाले. राजाच्या हातात सर्व सत्ता नसे. राजेपद वंशपरंपरागत दिले जात नसे. राजाच्या निधनानंतर अल्पवयीन किंवा अकर्तृत्ववान मुलास राजेपद दिले जात नसे. उलट राजघराण्यातील कर्तृत्ववान भावास, पुतण्यास किंवा योग्य व्यक्तीस हे पद देण्यात येत असे. इंग्लंडमध्ये राजपद हे वंशपरंपरेने मिळत असले तरी विशिष्ट परिस्थितीत राजाची निवड करण्याचे अधिकार है विटेनजीमॉटला होते. इंग्लंडचे प्रशासन शायर, हंड्रेड, खेडेगाव या तीन संस्थात विभागले होते. नंतरच्या काळात इंग्लंडवर राज्य केले. पण इंग्लंडवर राज्य करत असताना इंग्लंडच्या जनतेने अनियमित राजेशाही प्रस्थापित होऊ दिली नाही. माला अपवाद ठरला स्टुअर्ट घराण्याचा काळ. इ.स. १६०३ मध्ये राणी एलिझाबेथचा मृत्यू झाला. परिणामी राणीला अपत्य नसल्यामुळे स्कॉटलंडवर राज्य करणारा स्टुअर्ट घराण्यातील जेम्स पहिला इंग्लंडचा राजा झाला. त्यामुळे इंग्लंडमध्ये स्टुअर्ट घराण्याची राजवट सुरू झाली. स्टुअर्ट राजांचे व्यक्तिमत्व १६८८ च्या वैभवशाली क्रांतीला कारणीभूत झाले. जनतेला राजाविरुद्ध बंड किंवा विरोध करण्याचा नैतिक अधिकार नाही असे तो उघडपणे बोलून दाखवीत असे. राजेशाही ही जगातील सर्वांत सुंदर व उत्तम गोष्ट असून ती परमेश्वराला मान्य आहे. राजे हे पृथ्वीवरील परमेश्वर आहेत असे त्यांचे मत होते. त्यामुळे राजांना राजेपद परमेश्वराने दिले असून तो आपल्या कृतीबाबत परमेश्वराला जबाबदार असतो, जनतेला जबाबदार नसतो. राजाच्या कोणत्याही कृत्याबद्दल चौकशी किंवा जाब विचारण्याचा जनतेला अधिकार नाही असे त्याचे मत होते. परिणामी राजा विरुद्ध जनता यांच्यातील संघर्ष वाढत गेला. त्यातून इ.स. १६८८ ची रक्तहीन वैभवशाली राज्यक्रांती घडून आली.

### वैभवशाली राज्यक्रांतीची पार्श्वभूमी

एकमेकांच्यात भांडणाया टोळ्यामधील कर्तबगार, शुर, पराक्रमी पुरुषाला राजेपद प्राप्त झाले. प्रिन्सेप या नावाने राजाला ओळखले जाते, रूढी, परंपरा, चालीरीती, संस्कृती अनुसरून राज्यकारभार केला जात असे. गरज भासल्यास नवीन कायदे तयार करून अंमलबजावणी केली जात असे. परंतु राजाच्या हातात सर्वं सत्ता नसे. राजेपद वंशपरंपरागत नसे. राजाच्या निधनानंतर मुलगा कर्तृत्ववान नसेल तर राजघराण्यातील जवळच्या नातेवाईकास हे पद दिले जात असे.

## विटने जिमॉट :

अँग्लो-सॅक्सन काळातील अनेक महत्त्वाच्या संस्थांपैकी विटने जिमॉट ही एक महत्त्वाची संस्था होय. या संस्थेमध्ये समाजातील विद्वान, चारित्र्यवान, निष्णवान व्यक्तींचा समावेश होत असे. राजाला त्याच्या कारभारात मार्गदर्शन करणे, चर्चा करणे, सल्ला देणे हे या संस्थेचे काम असे. या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे सामान्य माणसाला विटने जिमॉटमध्ये प्रवेश नव्हता. या संस्थेचे काम असे. या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे सामान्य माणसाला विटने जिमॉटमध्ये प्रवेश नव्हता. या संस्थेचे स्वरूप सरंजामशाहीचे होते. राजघराण्यातील कर्तबगार, पराक्रमी, व्यक्तीची निवड विटने जिमॉट करीत असे. अल्फ्रेड हा कर्तबगार बिटने जिमॉटने निवडलेला पहिला राजा होय. राजाला निवडण्याचा जसा अधिकार होता तसा अकार्यक्षम राजाला पदच्युत करण्याचा अधिकार विटने जिमॉटला असे.

## स्थानिक संस्था :

अँग्लो सॅक्शन कळात इंग्लंडमध्ये एकूण तीन स्थानिक संस्था निर्माण झाल्या. त्या स्थानिक संस्था म्हणजे शायर (जिल्हा) हंड्रेड (तालुका) व खेडेगाव अशी विभागणी झाली होती.

### शायर :

स्थानिक राज्यकारभाराचा मुख्य विभाग म्हणजे शायर किंवा जिल्हा होय, शायरच्या या सभेस शायर मूट किंवा शायर कोर्ट असे म्हणत असे. शायरच्या प्रमुखास एल्डरमन म्हणून ओळखले जाते. एल्डरमनची नेमणूक पिटॅनच्या सल्ल्यानुसार राजा करीत असे. शायर सभेच्या प्रमुखास शेरीफ म्हणत. एल्डरमनला बरेच अधिकार होते. या अधिकारांच्यामध्ये न्यायनिवाडा करणे, युद्धासाठी सैन्य जमा करणे, सैन्याचे नेतृत्व करणे, महसूल गोळा करणे, जमीन लागवडीखाली आणणे इत्यादी. काळाच्या ओघात एल्डरमनचे महत्त्व कमी होऊन शेरिफचे महत्त्व वाढले. परिणामी एल्डरमनचे सर्व अधिकार व जबाबदाऱ्या शेरीफकडे गेल्या. शेरिफ हा स्थानिक संस्था व मध्यवर्ती संस्था यांच्यातील दुव्याचे काम करी. त्यामुळे राजा व प्रजा यांच्यामधील महत्त्वाचा दुवा म्हणून शेरिफला ओळखण्यात येऊ लागले.

### हंड्रेड (Hundred) तालुका

एकापेक्षा अनेक खेडेगावांचे मिळून हंड्रेड बनत असे. येथे हंड्रेड मूट नावाची एक सभा असे. या सभेत नेमके किती सदस्य असत हे कळत नाही. पण खेडेगावचे प्रतिनिधी, मोठे जमीनदार यांचा सदस्य म्हणून समावेश असे. या सदस्यातून या सभेचा अध्यक्ष निवडला जात असे. महिन्यातून एकदा या सभेची बैठक भरत असे. या सभेमार्फत न्यायनिवाडा करणे, युद्धासाठी सैन्य जमा करणे, सैन्यांचे नेतृत्व करणे, नवीन जमीन लागवडीखाली आणणे, महसूल गोळा करणे इत्यादी कामे या सभेमार्फत केली जात.

### खेडेगाव :

अँग्लो सॅक्शन काळात राज्यकारभाराच्या सोईसाठी अनेक छोटे मोठे विभाग होते. त्यापैकी सर्वात लहान विभाग म्हणजे खेडेगाव होय. खेडेगाव ही इंग्लंडमधील सर्वात जुनी सभा होती. सभेच्या प्रमुखाला रीव्ह या नावाने ओळखले जात असे. खेड्याचा कारभार स्वतंत्रपणे चालत असे. महिन्यातून एकदा खेडेगावची सभा भरवली जात असे. खेडेगावचा प्रमुख व्यवसाय शेती हा होता. तसेच खेड्यात शांतता व सुव्यवस्था राखणे, भांडणे मिटविणे, योग्य तो न्यायनिवाडा करणे इत्यादी कामे या सभेमार्फत केली जात.

### इंग्लंडमधील राजघराणी

इ.स. ६०० ते १०६६ या अँग्लो-सॅक्शन काळात आजच्या लोकशाहीतील विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा उगम दिसतो. इंग्लंडच्या लोकशाहीस अँग्लो-सँक्शनच्या काळाची प्रमुख देणगी आहे. अँग्लो सॅक्शनच्या या विचारामुळे (देणगी) जेव्हा जेव्हा इंग्लंडमध्ये अनियंत्रित राजेशाहीने डोके वर काढले. त्याविरोधी लोकांनी विरोध केला. अनियंत्रित राजेशाहीविरोधी उठाव, चळवळी, मोर्चे, आंदोलने केली. त्यामुळे इंग्लंडमध्ये लोकशाहीचा विकास होत गेला. या विकासाच्या काळात इंग्लंडमध्ये अनेक राजघराणी उदयास आली. या राजघराण्यातील अनेक राजांनी इंग्लंडवर राज्य केले. पण इंग्लंडच्या जागरुक जनतेने इंग्लंडमध्ये अनियंत्रित राजेशाही प्रस्थापित होऊ दिली नाही. परिणामी लोकशाही बळकट करण्यासाठी ज्या घटकांनी मदत केली त्याची माहिती पुढीलप्रमाणे-

### नॉर्मन कालखंड

इ.स. १०६६ मध्ये राजा हॅरॉल्ड हा इंग्लंडचा राज्यकारभार करत होता. फ्रान्समधील नॉर्मंडी प्रांताचा राजा विल्यम याने इ.स. १०६६ मध्ये इंग्लंडवर स्वारी केली. त्यामुळे इंग्लंडचा राजा हॅरॉल्डचा पराभव झाला. विल्यम हा इंग्लंडचा राजा झाला. परिणामी ॲग्लो सॅक्शन काळातील न्या संस्था होत्या त्या बंद करून नवीन निर्माण केल्या. त्यामध्ये जिटेनजीमॉट या सभेचे महत्त्व कमी झाले. परिणामी ग्रेट कॉन्सिलचा उदय झाला. या ग्रेट कौन्सिलच्या सल्ल्याने इंग्लंडमधील राजे आपला राज्यकारभार करू लागले. इ.स. १९५४ साली नॉर्मन कालखंड संपला. त्यानंतर इंग्लंडमध्ये अँजो प्लॅन्टाजेनेट घराणे उदयास आले.

### अँजो प्लॅन्टाजेनेट घराणे (इ.स. ११५४ ते १३९९)

इ.स. १९५४ ते १३९९ या कालखंडात प्लॅन्टाजेनेट घराण्याचे एकूण आठ राजे होऊन गेले. प्रत्येकाने आपापल्या परीने राज्याकारभार केला. जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न केला. पण जॉन राजाची कारकिर्द ऐतिहासिक ठरली. त्यांनी १२१५ मध्ये

मॅग्ना चार्टा (Magna Charta) मोठी सनद सरदारांना बहाल केली. या सनदेमुळे इंग्लंडच्या राजाच्या अनियंत्रित सत्तेवर नियंत्रण आले. ही सनद म्हणजे लोकशाहीचा उदय होय. जॉन राजा लोकशाहीचा पुरस्कर्ता असल्याने त्याने आपल्या सरदार, सरंजामदार व जनतेला अनेक हक्क लिखित स्वरूपात दिले. जॉन राजाने जनतेला हक्क देत असता मॅग्ना चार्टातील ६१ व्या कलमानुसार राजावर पूर्ण नियंत्रण ठेवण्याचा अधिकार सरंजामदारांना दिला. परिणामी जॉन राजानंतर इंग्लंडच्या सत्तेवर आलेल्या तिसऱ्या हेन्रीने अनियंत्रित पद्धतीने राज्यकारभार करताच जनतेने राजाविरुद्ध युद्ध सुरू केले. या युद्धानंतर लॅकेस्टर घराण्याचा राजा हेन्री इंग्लंडच्या सत्तेवर आला.

**लॅस्टर व मार्क काळ (इ.स. १३९९ ते १४८५)**

इ.स. १४५५ से १४८५ या काळात लेकेस्टर या यॉर्किस्ट घराण्यामध्ये सत्तासंघर्ष झाला. गुलाबाचे युद्ध या नावाने हा सत्तासंघर्ष इतिहासप्रसिद्ध आहे. लॅकेस्टर घराण्याची खूण लाल गुलाबाचे फुल तर यॉर्किस्ट घराण्याची खूण पांढऱ्या गुलाबाचे फुल त्यामुळे त्यास गुलाबाचे युद्ध या नावाने ओळखले जाते. परिणामी राजे कमकुवत व दुबळे झाले व पार्लमेंट बळकट झाली.

**ट्यूडर कालखंड (इ.स. १४८५ ते १६०३)**

ट्यूडर घराण्यातील साधारणपणे पाच राजेंनी इंग्लंडवर जवळजवळ १२० वर्ष राज्य केले. ट्यूडर कालखंडातील राजे अनियंत्रित होते. त्यांचा राज्यकारभार लोकाभिमुख होता. राज्याचे पर्यायाने जनतेचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सैन्य बाळगले होते. आठवा हेन्री यांच्या कारकिर्दीत इंग्लंडचा राजधर्म प्रॉटेस्टंट झाला. चर्च ऑफ इंग्लंड ही धर्मसंस्था निर्माण झाली. रोमच्या पोपशी असणारे धार्मिक नाते संपुष्टात आले.

**स्टुअर्ट घराण्याचा काळ (इ.स. १६०३ ते १७१३)**

इ.स. १६०३ मध्ये ट्यूडर घराण्यातील राणी एलिझाबेथ हिचा मृत्यु झाला. तिला बारस नसल्यामुळे स्टुअर्ट घराण्यातील पहिला जेम्स इंग्लंडचा राजा झाला, इंग्लंडमध्ये स्टुअर्ट घराण्याची राजवट सुरू झाली.स्टुअर्ट राजा पहिला जेम्स मूळचा स्कॉटलंडचा होता. त्यामुळे इंग्लंड-स्कॉटलंड बाद निर्माण झाला, स्कॉटलंडच्या इंग्लंडमधील समावेशाने हा वाद संपला. इ.स. १६०३ ते १७१३ या ११० वर्षांच्या कालखंडात स्टुअर्ट घराण्यातील एकूण सात राजांनी राज्यकारभार केला. स्टुअर्ट घराण्यातील पहिला जेम्स यांचा कालखंड महत्त्वाचा मानला जातो. वैभवशाली राज्यक्रांती याच राजाच्या काळात आली. स्टुअर्ट काळातील राजांनी वंशपरंपरागत वारसा हक्काचा पुरस्कार केला. राजा पहिला जेम्स यांच्या मतानुसार राजाला राज्यकारभार करण्याचा अधिकार परमेश्वराने दिलेला आहे. त्यामुळे राजा आपल्या कृत्याबद्दल परमेश्वराला जबाबदार असतो. जनतेला जबाबदार नसतो. परिणामी राजा विरुद्ध पार्लमेंट यांच्यातील संघर्ष राजा पहिला जेम्स यांच्या कालखंडात वाढीस लागला.

इ.स. १६८५ मध्ये दुसरा जेम्स इंग्लंडचा राजा झाला. तो कर्तृत्ववान नव्हता. तो धोरणी मुत्सद्दी नव्हता. तो चैनी, विलासी वृत्तीचा होता. तो अनियंत्रित राज्यसत्तेचा पुरस्कर्ता होता. त्याच्या मनमानी राज्यकारभारामुळे इंग्लंडमधील जनतेत असंतोष वाढत गेला. राजा जेम्स व जनता यांच्यातील संघर्ष सुरू झाला. हा संघर्ष वाढत गेला. त्यातून इ.स. १६८८ ची रक्तहीन (वैभवशाली राज्यक्रांती) घडून आली.

## वैभवशाली राज्यक्रांतीची कारणे

इ.स. १६८८ साली इंग्लंडमध्ये वैभवशाली राज्यक्रांती घडली. इंग्लंडच्या इतिहासात या क्रांतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तसेच जगाच्या इतिहासात या क्रांतीस महत्त्वाचे स्थान आहे. कारण या क्रांतीला वैभवशाली रक्तहीन, ग्लोरियस या नावांनी ओळखले जाते. क्रांतीनंतर इंग्लंडमधील सत्तांतर अत्यंत शांत व संयमी मार्गाने झाले. राजा विरुद्ध सर्व जनता असा संघर्ष सुरू होता. या क्रांतीत जनतेचा विजय झाला. या संघर्षात रक्ताचा एक थेंबही न सांडता इंग्लंडचा राजा दुसरा जेम्स यांना पदच्युत केले. या क्रांतीत विजयी झालेल्या जनतेने विल्यम व मेरी यांना इंग्लंडच्या राजपदावर बसविले. अशाप्रकारे रक्ताचा एकही थेंब न सांडता राज्यक्रांती घडून आली. एवढेच नव्हे तर अनियंत्रित राजेशाहीचा व वंशपरंपरागत वारसाहक्काचा पुरस्कार करणाऱ्या राजाचा व त्याच्या राजघराण्याचा शेवट केला. अनियंत्रित राजेशाही पार्लमेंच्या नियंत्रणाखाली नियंत्रित राजेशाही इंग्लंडमध्ये सुरू केली. या राजा विरुद्ध प्रजा (पार्लमेंट) संघर्षात

लोकांचा विजय झाला. या संघर्षात रक्ताचा एक थेंबही न सांडता लोकांचा विजय झाला. त्यामुळे या क्रांतीस रक्तहीन किंवा वैभवशाली क्रांती असे म्हणतात. या क्रांतीस अनेक कारणे कारणीभूत झालेली आहेत ती थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) दुसरा जेम्सची अनियंत्रित राजेशाही**;-

पहिल्या चार्लसने मनमानी राज्यकारभार केला. त्यामुळे इंग्लंडमध्ये यादवी सुरू झाली. या यादवीत चार्लसचा शिरच्छेद केला. चार्लसच्या शिवच्छेदानंतर दुसरा जेम्स इंग्लंडचा राज्यकारभार करू लागला. त्याच्या मनमानी कारभारामुळे इंग्लंडमधील जनतेत असंतोष निर्माण झाला. राजा विरुद्ध जनता असा संघर्ष सुरू झाला. राजा आपल्या ईश्वरदत अधिकाराच्या धोरणावर ठाम होता. राजा कायद्यापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे असे तो मानत असे. जनतेने आपल्या आज्ञा कोणतीही तक्रार न करता पाळाव्यात असा त्याचा आग्रह होता. त्यामुळे आपण वेळोवेळी संघर्ष करून मिळविलेले अधिकार व हक्क संपुष्टात येतील म्हणून जनतेत राजाविरुद्ध असंतोष निर्माण झाला. त्यातून राजा विरुद्ध जनता संघर्ष सुरू झाला. या संघर्षात जनतेचा विजय झाला व वैभवशाली राज्यक्रांती घडून आली.

**२) कॅथॉलिक धर्माच्या पुनर्स्थापनेसाठी प्रयत्न :**

दुसरा जेम्स कट्टर कॅथॉलिक होता. त्यामुळे त्याने कॅथॉलिक धर्माच्या पुनर्स्थापनेसाठी त्याने जोरात प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर इंग्लंडमधील प्रजेने कॅथॉलिक धर्माचा स्विकार केला पाहिजे असा त्याचा अट्टाहास होता. पण कॅथॉलिकांच्या विरोधात त्या काळी इंग्लंडमध्ये "टेस्ट ॲक्ट" नावाचा कायदा होता. हा टेस्ट "ॲक्ट" रद्द करण्याचा दुसरा जेम्सने प्रयत्न केला. पार्लमेंटने या निर्णयास विरोध केला. परिणामी राजा व पार्लमेंट निकराचा संघर्ष सुरू झाला. राजाने संघर्षांची दखल न घेता तो कायदा आपल्या अधिकारात रद्द केला. त्यामुळे राजा विरुद्ध पार्लमेंट असा टोकाचा संघर्ष निर्माण झाला.

**३) इंग्लंडमधील धर्मसंस्था मोडण्याचे प्रयत्न :**

इंग्लंडमधील कॅथॉलिक लोकांच्या संरक्षणासाठी "प्रिरॉगेटिव्ह कोर्ट ऑफ हाय कमिशन" नावाचा कायदा अस्तित्वात होता. या कायद्यात बदल करून जेम्सने त्याला "दि कोर्ट ऑफ इक्लमॅटिकल कमिशन" हे नाव दिले. या कायद्याच्या आधारे त्याने धार्मिक बाबीवर अनेक बंधने लादली. परिणामी सर्वत्र असंतोष निर्माण झाला. एवढेच नव्हे तर इंग्लंडमध्ये प्रोटेस्टंट हा इंग्लंडचा राजधर्म म्हणून स्विकारला. धार्मिक बाबींच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी "चर्च ऑफ इंग्लंड" संस्था स्थापन केली. दुसरा जेम्स सत्तेवर येताच पार्लमेंटने धार्मिक बाबतीत घेतलेले निर्णय रद्द केले. कॅथॉलिकांच्यावरील पूर्वी लादलेली बंधने 'डिक्लरेशन ऑफ इंडलजन्स' फर्मान काढून दूर केली. सदरचे फर्मान आर्चबिशपने चर्चमध्ये वाचून दाखविण्याची सक्ती केली. आर्चबिशपने फर्मान वाचून दाखवावे असा हुकूम काढला. आर्चबिशपने सदरचे फर्मान वाचून दाखविण्यास विरोध केला. राजाने आर्चबिशप व बिशपना कैदेत टाकले. त्याच्यावर खटला दाखल केला. कोर्टाने त्यांना निर्दोष म्हणून जाहीर केले. परिणामी राजा व लोकांच्यात असंतोष निर्माण झाला.

**४) जेम्सचे आक्रमक धोरण :**

इंग्लंडमध्ये राजा विरोधी लोक असा संघर्ष निर्माण झाला. राजा अधिकच आक्रमक झाला. त्याने पार्लमेंटच्या मान्यतेशिवाय जबरदस्तीने जकात वसूली सुरू केली. तसेच नवीन सैन्यभरती सुरू केली. त्यामध्ये कॅथॉलिक सैन्यांची भरती केली. सैन्यामध्ये वरिष्ठ व मानाच्या जागी कॅथॉलिकांच्या नेमणूका केल्या. लोकांचा राजाला होणारा विरोध या सैन्यामार्फत मोडून काढला. राजाने आपली दहशत निर्माण केली. परिणामी पार्लमेंट ही सर्व सैन्यभरती व अधिकाऱ्यांच्या नेमणूका बेकायदेशीर ठरविल्या. राजाने पार्लमेंट बरखास्तीचा निर्णय जाहीर केला. राजाविरुद्ध सर्वत्र असंतोष निर्माण झाला. सर्वत्र राजाविरोधी मोर्चे, आंदोलने, उठाव होऊ लागले. राजाने सैन्यांच्या जोरावर सर्व मोडून काढले. त्यामुळे राजा व जनता संघर्ष तिव्र झाला. सर्वत्र क्रांतीचे वातावरण निर्माण झाले.

**५) अत्याचारी राजा जेम्स दुसरा :**

राजा दुसऱ्या जेम्सने आपल्या विरोधकांना कठोर शासन सुरू केले. ड्यूक ऑफ मॅनमाऊथ हा राजपुत्र दुसऱ्या चार्लस राजाचा अनौरस मुलगा होता. तो कट्टर प्रोटेस्टंट होता. तो जनतेचा लोकप्रिय व लाडका होता. त्यामुळे हाच राजपुत्र इंग्लंडचा राजा व्हावा असे सर्वांना वाटत होते. त्याने इंग्लंडच्या गादीवर अधिकार व हक्क सांगितला. त्याने आपल्या हक्कासाठी उठाव केला. जेम्सने मोडून काढला. ड्यूक ऑफ मॅनमाऊथला पकडले व अत्यंत क्रूर पद्धतीने ठार मारले. उठावात ज्यांनी ज्यांनी भाग घेतला त्या सर्वांच्यावर खटले भरले.

हे खटले चालविण्यासाठी 'जेफरी' या नावाच्या न्यायाधिशाची नेमणूक केली. जेफरी इंग्लंडमधील भ्रष्ट न्यायाधीश म्हणून प्रसिद्ध होता. जेफरी न्यायमंडळाने ३०० लोकांना फाशी दिले. या घटनेने इंग्लंडमध्ये जेम्स विरोधी असंतोष अशांत वातावरण निर्माण झाले. त्यामुळे राजाच्या अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यास जनता तयार झाली.

**६) राजा जेम्स-**

अविचारी धोरण राजा जेम्स कट्टर कॅथॉलिक पंथीय होता. त्यामुळे त्याने कशाचाही विचार न करता लष्कर, नौदल, मुलकी, न्यायसंस्था, येथे असणाऱ्या वरिष्ठ मानाच्या पदांवरील प्रोटेस्टंट लोकांना काढून टाकण्यात आले. त्यांच्या ठिकाणी कॅथॉलिकांच्या नेमणूका करण्यात आल्या. त्यामध्ये मंत्री व प्रिव्ही कौन्सिलचे सदस्य या नात्याने कॅथॉलिकांच्या नेमणूका केल्या. केंब्रिज विद्यापीठातील अनेक प्रोटेस्टंट प्राध्यापकांना नोकरीवरून कमी केले. त्यांच्या ठिकाणी अनेक कॅथॉलिक प्राध्यापकांच्या नेमणूका केल्या. अशा प्रकारे कॅथॉलिक पंथीय धोरण व प्रोटेस्टंटांच्यावर अन्याय, अत्याचार व जुलूम केला. त्यामुळे राजाविरुद्ध जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला.

**७) फ्रान्सचा बादशहा मैत्रीपूर्ण संबंध :**

इंग्लंडचा राजा जेम्स, दुसरा हा अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कर्ता होता. त्याने इंग्लंडमध्ये मनमानी कारभार सुरू केला होता. त्याने फ्रान्सचा बादशहा चौदाई लुई। यांच्याबरोबर मैत्री केली. ही मैत्री इंग्लंडमधील लोकांना व पार्लमेंटला मान्य नव्हती. कारण चौदावा लुई कॅथॉलिक पंथाचा पुरस्कर्ता व हुकुमशाही राज्यकारभार करीत होता. त्याने फ्रान्समधील धार्मिक स्वातंत्र्यावर अनेक बंधने लादली. याउलट कॅथॉलिक धर्मीयांना अनेक सवलती दिल्या. राजा जेम्सलासुद्धा इंग्लंडमध्ये कॅथॉलिकांचे वर्चस्व प्रस्थापित करावयाचे होते. यासाठी तो चौदाव्या लुईची मदत घेत असे. इंग्लंडच्या जनतेला नेमके हेच नको होते. चौदावा लुई इंग्लंडच्या व्यापार व उद्योगधंद्यामध्ये हस्तक्षेप करून वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत होता. या कारणामुळे इंग्लंडचा राजा व पार्लमेंट यांच्यात संघर्ष सुरू झाला.

**८) राजा जेम्स स्टुअर्टचे खास अधिकार**

राजा जेम्स हुकुमशाहीचा पुरस्कर्ता होता. याच पद्धतीने त्याने इंग्लंडचा राज्यकारभार केला. जनतेला या पद्धतीचा राज्यकारभार मान्य नसल्याने पार्लमेंटचा व लोकांचा विरोध होता. पण राजास या विरोधाची पर्वा नव्हती. त्याने खास अधिकार मिळविले होते. या खास अधिकाराचा राजा जेम्स दुरुपयोग करत होता. जेम्सचे हे धोरण जनतेचे उल्लंघन करणारा होता असे जनतेचे मत होते. राजापेक्षा पार्लमेंट श्रेष्ठ त्यामुळे पार्लमेंटने केलेला कायदा सर्वश्रेष्ठ अशी लोकांची धारणा होती. त्यामुळे राजाच्या विरोधी इंग्लंडमधील जनमत तयार झाले होते. त्यातून राजाविरोधी लोकांच्यामध्ये असंतोष वाढत गेला व क्रांतीस पोषक वातावरण निर्माण झाले.

**९) तात्कालिक कारण :**

राजा दुसरा जेम्स यांना दोन मुलीच होत्या. या दोन्ही मुली प्रोटेस्टंट पंथाच्या पुरस्कर्त्या होत्या. त्यांपैकी एक हॉलंडचा राजा विल्यम ऑफ ऑरेंज यांना दिली होती. विल्यम प्रोटेस्टंट पंथाचा पुरस्कर्ता होता, जेम्स दुसरा राजाचे वय झाल्याने तो जास्त दिवस जगणार नाही असे जनतेस वाटत होते. राजाच्या मृत्यूनंतर आपणास हव्या त्या व्यक्तीस इंग्लंडच्या गादीवर बसविता येईल असे इंग्लंडच्या पार्लमेंट व प्रजेला वाटत होते. परंतु १० जून १६८८ मध्ये जेम्स राजाला मुलगा झाला. या राजपुत्राच्या जन्मामुळे इंग्लंडच्या जनतेस आनंद होण्याऐवजी दुःख झाले. कारण राजाचा वारस या नात्याने इंग्लंडचे राजपद मुलाकडे जाणार. परत इंग्लंडमध्ये कॅथॉलिक पंथीयाचे वर्चस्व निर्माण होईल. त्यामुळे अन्याय व अत्याचार सुरू राहणार, अन्याय, अत्याचार या दिवसाची वाट पाहण्यापूर्वीच जनतेने राजाविरुद्ध उठावास सुरुवात केली. त्यामुळे सर्वत्र क्रांतीचे वातावरण निर्माण झाले.

## वैभवशाली राज्यक्रांतीची वाटचाल

इंग्लंडमध्ये प्रामुख्याने 'व्हिंग' व टोरी असे दोन राजकीय पक्ष होते. टोरी पक्षाच्या पाठिंब्यामुळे इंग्लंडचा राजा दुसरा जेम्स सत्तेवर आला. जेम्सने हुकूमशाही वृत्तीने इंग्लंडचा राज्यकारभार सुरू केला होता. त्यामुळे राजाच्या विरोधात सर्वत्र असंतोष निर्माण झाला होता. दरम्यान राजाला मुलगा झाला. जनतेने राजपुत्राचे स्वागत भविष्यकाळातील अन्याय, अत्याचाराची भिती वाटू लागली. भविष्यातील येणारे संकट टाळण्यासाठी इंग्लंडमधील व्हिंग व टोरी पक्षांचे नेते एकत्र आले. त्यांनी दोन्ही पक्षाची संयुक्त बैठक घेऊन अत्याचारी

जेम्सला पदच्युत करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी हॉलंडची राणी दुसऱ्या जेम्सची मुलगी व जेम्सचा जावई विल्यम यांना इंग्लंडमध्ये येऊन राज्य ताब्यात घेण्याची विनंती केली. विल्यम व मेरी १५००० सैन्यासह इंग्लंडच्या किनाऱ्यावरील टॉरबी येथे दाखल झाले. दुसरा जेम्स ३०००० सैन्यासह जावयाविरुद्ध लढण्यासाठी टॉरबी येथे दाखल झाला. आपल्या अन्यायी अत्याचारी राज्यकारभारामुळे या युद्धप्रसंगी जनता आपल्या बाजूने नसल्याने तो दुःखी झाला. त्यामुळे ऐनवेळी युद्धाचा निर्णय रद्द करून दुसरा जेम्स आपला लहान मुलगा व राणीसह इंग्लंडमधून फ्रान्सचा सम्राट चौदावा लुई यांच्या आश्रयास गेला. जाताना राजमुद्रा व राजमुकुट टेम्स नदीमध्ये फेकून दिला. राजाच्या पलायनाने इंग्लंडचे राजपद रिकामे झाले. रक्तपात न होता क्रांती झाली. त्यामुळे या क्रांतीस 'रक्तहीन" राज्यक्रांती या नावाने ओळखले जाते.

या राज्यक्रांतीमुळे इंग्लंडचे राजपद रिकामे झाले. राजपद रिक्त असताना देखील पुढील धोरण ठरविण्यासाठी राजाच्या आज्ञापत्राशिवाय पार्लमेंट भरविण्यात आली. तिला 'कन्व्हेनशन पार्लमेंट' असे म्हणतात. पार्लमेंट व जनतेचे परंपरेने चालत आलेले हक्क व अधिकार जाहीर करण्यासाठी पार्लमेंटने 'जनतेच्या हक्काचे पत्रक', 'बिल ऑफ राईटस्' तयार केले. बिल ऑफ राईटस् हा कायदा विल्यम व मेरी या राजाराणीपुढे ठेवला. तो पास करून घेतला. त्यानंतर १३ फेब्रुवारी १६८९ रोजी विल्यम व मेरी यांचाराज्याभिषेक झाला.क्रांती यशस्वी झाली.

## इ.स. १६८८ च्या वैभवशाली राज्यक्रांतीचे परिणाम

वैभवशाली राज्यक्रांती ही इंग्लंडच्या नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना आहे. रक्ताचा एकही थेंब न सांडता ही राज्यक्रांतीची यशस्वी झाली. राजापेक्षा प्रजा श्रेष्ठ आहे. हे या क्रांतीने संपूर्ण जगाला एक संदेश दिला. त्यामुळे राजाला जनतेच्या भावनेचा तसेच अडचणी व समस्या जाणून घेऊन त्याची सोडवणूक केली पाहिजे हे लक्षात आले. मी राजा आहे. मी सर्वश्रेष्ठ आहे. मी परमेश्वराचा अंश आहे. माझ्यावर कोणतेही बंधन नाही. मी करेल ती पूर्वदिशा. या भ्रमातून जगातील नेक राजे जागे झाले. त्यांनी जनतेच्या विकासाच्या दृष्टीने राज्यकारभार सुरू केला. या वैभवशाली राज्यक्रांतीमुळे इतिहासाला वेगळे वळण मिळाले. म्हणूनच या राज्यक्रांतीचे परिणाम पाहणे आवश्यक ठरते.

**१) अनियंत्रित राजेशाहीचा शेवट:**

इंग्लंडमधील राजे हे स्वतःला परमेश्वराचे प्रतिनिधी समजत असत. राजांना राजेपद परमेश्वराने दिले असून तो आपल्या कृत्याबद्दल परमेश्वराला जबाबदार असतो. जनतेला जबाबदार नसतो. जनतेला जाब विचारण्याचा अधिकार नसतो असे राजाचे मत होते. परंतु या क्रांतीने परमेश्वरी वरदानाचा सिद्धांत मोडीत काढला. पार्लमेंट व जनता एकमेकांच्या सहकार्याशिवाय राजास राज्यकारभार करणे अवघड आहे हे स्पष्ट झाले. राजा जोपर्यंत लोकांच्या विश्वासास पात्र आहे तोपर्यंत राजपद सुरक्षित आहे हे स्पष्ट आहे. त्यामुळे या क्रांतीने इंग्लंडमधील अनियंत्रित राजेशाहीचा शेवट केला.

**२) राजा आणि पार्लमेंट संबंध :**

ब्रिटीश राष्ट्र उभे राहण्याच्या प्रक्रियेमध्ये स्टुअर्ट राजघराण्याची कामगिरी मोलाची आहे. इ.स. १६०३ मध्ये स्टुअर्ट राजघराणे इंग्लंडच्या सत्तेवर आले. स्टुअर्ट राजे अनियंत्रित राजशाहीचे पुरस्कर्ते होते. याउलट पार्लमेंट नियंत्रित राजेशाहीबाबत आग्रही होती. त्यामुळे स्टुअर्ट राजे व पार्लमेंट यांच्यात सतत संघर्ष होत असे. इ.स. १६८५ मध्ये जेम्स स्टुअर्ट दुसरा याने इंग्लंडच्या राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली. त्याने कोणाची पर्वा न करता हुकूमशाही पद्धतीने राज्यकारभार केल्याने त्यांच्या विरोधी सर्वत्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. परिणामी लोकांनी १६८८ ची राज्यक्रांती घडवून आणली. जेम्सने राजत्याग केला. त्याच्या जागेवर विल्यम व मेरी यांची नियुक्ती केली. त्याने पार्लमेंटच्या निर्देशानुसार राज्यकारभार सुरू केला. त्यामुळे राजा व पार्लमेंट यांच्यातील संघर्षाचा शेवट झाला.

**३) पार्लमेंटचे सार्वभौमत्त्व :**

इंग्लंडमध्ये राज व पार्लमेंट यांच्यात सार्वभौमत्त्वासाठी संघर्ष सुरू होता. इ.स. १६८८ च्या राज्यक्रांतीने संघर्षाचा निकाल लावला. लोकांच्या विश्वासाशिवाय राज्यकारभार शक्य नाही हे या क्रांतीने जगाला दाखवून दिले. त्यामुळे अनियंत्रित राज्यकारभार करणाऱ्या दुसऱ्या जेम्सला राजत्याग करावा लागला. राजत्याग केल्यानंतर त्याच्या वारसाचा हक्क डावलून विल्यम व मेरी यांना इंग्लंडच्या राजगादीवर बसविले. त्यामुळे राजापेक्षा पार्लमेंट सर्वश्रेष्ठ आहे हे सिद्ध झाले. इंग्लंडमध्ये लोकशाही सुरू झाली. राजापेक्षा पार्लमेंट व जनता सार्वभौम आहे हे सिद्ध झाले.

**४) व्हिग व टोरी पक्षात एकमत**

इ.स. १६८८ च्या क्रांतीपूर्व या दोन्ही पक्षातील सदस्यांच्या भूमीका वेगवेगळया होत्या. परंतु कोणाचीच मदत न मिळाल्याने इंग्लंडचा दुसरा जेम्स पळून गेला. इंग्लंडमध्ये अंतर्गत बंडाळी व परकीय आक्रमनाच्या भितीने टोरी व व्हिग मतभेद विसरून एकत्र आले. या दोन्ही पक्षाने इंग्लंडच्या प्रगतीसाठी, विकासासाठी व जनतेच्या कल्याणासाठी तडजोड स्विकारून एकत्र आले. त्यांच्यात दोन्ही पक्षाने एका विचाराने आर्थिक, अंतर्गत व परराष्ट्रीय धोरणात लोकहिताचे निर्णय घेतले. परिणामी इंग्लंडच्या विकासास गती मिळाली. परिणामी इंग्लंडचे लष्कर व नाविक दल सक्षम बनले. या लष्करी व नाविकदलाच्या मदतीने आफ्रिका, आशिया, ऑस्ट्रेलिया, अमेरिका या खंडात त्यांनी वसाहती स्थापन करण्यास सुरुवात केली.

**५) इंग्लंडमध्ये लोकशाही पद्धतीचा उदय**

इंग्लंडचा राजा दुसरा जेम्स पळून गेला. इंग्लंडचे राजपद रिक्त झाले. इंग्लंडमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली. त्यामुळे टोरी व व्हिग पक्ष मतभेद विसरून एकत्र आले. त्यानी दुसऱ्या जेम्सची मुलगी मेरी व तिचा पती तिसरा विल्यम इंग्लंडचे राज्य बहाल केले. या क्रांतीनंतर जनतेने बिल ऑफ राईटस् मंजूर करून घेतले. राजाचे अधिकार पार्लमेंटने कमी केले. परंतु मंत्रीमंडळातील मंत्र्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार राजाकडेच ठेवण्यात आला. व्हिंग व टोरी या पक्षातून मंत्रीमंडाची निवड केली जात असे. या दोन्ही पक्षातील मंत्र्यांच्यात स्वार्थामुळे एकी राहीली नाही. परिणामी राज्यकारभारामध्ये अनंत अडचणी निर्माण झाल्या. यातून मार्ग काढण्यासाठी कॉमन्स सभेत ज्या पक्षाचे बहुमत असेल त्या पक्षातील सक्षम सदस्यांना घेऊन मंत्रीमंडळ नेमण्यात येऊ लागले. त्यामुळे इंग्लंडमध्ये मंत्रीमंडळ पद्धती सुरू झाली. इंग्लंडमध्ये अनेक वर्षांनंतर लोकशाही सुरू झाली. इंग्लंडमधील या आदर्श लोकशाहीचे अनुकरण अनेक देशांनी सुरू केले.

**६) स्वतंत्र न्यायव्यवस्था :**

इंग्लंडमध्ये क्रांतीपूर्व काळात स्वतः राजा न्यायाधिशांच्या नेमणुका करीत असे. त्यामुळे न्यायाधीश राजास जबाबदार असत. न्यायाधिशांच्या न्यायालयीन निर्णयावर अप्रत्यक्षपणे राजाचा दबाव राहत असे. त्यामुळे काही बाबतीत निपक्षपणे न्याय मिळेलच यांची खात्री नसे. या ऐतिहासिक वैभवशाली क्रांतीनंतर न्यायालयीन विभाग स्वतंत्र करण्यात आला. स्वतंत्रपणे न्यायव्यवस्थेचे काम सुरू झाले. त्यामुळे निःपक्षपाती न्याय मिळू लागला. या आदर्श न्यायव्यवस्थेचे सर्वत्र अनुकरण करण्यात येऊ लागले.

**७) सक्षम प्रभावी परराष्ट्र धोरण**

इंग्लंडचा राजा दुसरा जेम्स हा हुकुमशाली प्रतीचा होता. त्याचे परराष्ट्र धोरण प्रबळ नव्हते. फ्रान्सचा सम्राट चौदावा लुई याच्या प्रभावाखाली तो होता. त्यामुळे जास्तीत जास्त फ्रान्सला फायदेशीर परराष्ट्र धोरण आखले जात असे. तसेच इंग्लंडचे युरोपमधील परराष्ट्रधोरण धरसोडवृत्तीचे व कमकुवत होते. त्याचाच परिणाम म्हणून इंग्लंडमध्ये क्रांती घडून आली. क्रांतीनंतर विल्यम व मेरी यांच्या हाती इंग्लंडची सत्ता आली. सत्ताप्राप्तीनंतर विल्यम व मेरी यांनी सक्षम व प्रभावी परराष्ट्र धोरणाचा अवलंब केला. या त्यांच्या धोरणामुळे इंग्लंडचे युरोपच्या राजकारणात महत्त्व व प्रतिष्ठा वाढली. तसेच या राजा व राणीने फ्रान्सच्या विरोधातील राष्ट्रांचे संघटन केले. त्यामुळे सर्वत्र युरोपच्या राजकारणात इंग्लंडचा दबदबा निर्माण झाला.

**८) जनतेच्या मूलभूत हक्कास मान्यता :**

इंग्लंडमधील राजा दुसरा जेम्स याने जनतेच्या भावनेचा, समस्यांचा विचार न करता राज्यकारभार केला. हा राज्यकारभार हुकुमशाही वृत्तीचा होता. त्यामुळे अनियंत्रित राजसत्तेविरुद्ध असंतोष निर्माण झाला. परिणामी क्रांती घडून आली. क्रांतीनंतर विल्यम व मेरी यांनी इंग्लंडचे सत्ताधीश म्हणून राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. इंग्लंडमधील राजकीय परिस्थितीचे आकलन त्यांना होते. त्यामुळे त्यांनी राज्यकारभार हाती घेताच जनतेस व्यक्तिस्वातंत्र्य भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य हे मुलभूत हक्कास मान्यता दिली.

**९) प्रोटेस्टंट प्रभावशाली बनले :**

या क्रांतीने कॅथॉलिक पंथीयांचा पराभव झाला. प्रोटेस्टंट पंथीयांचा विजय झाला. बिल ऑफ राईटस्मधील तरतुदीनुसार कॅथॉलिक पंथीय व्यक्ती इंग्लंडच्या गादीवर बसू शकणार नाही हे सिद्ध झाले. त्यामुळे इंग्लंड हे प्रोटेस्टंट राष्ट्र बनले. इंग्लंडमधील प्रशासनाने ख्रिश्चन धर्मातील इतर पंथीयांना सहिष्णुतेने वागविले. याउलट कॅथॉलिकांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची सहानुभूती दाखविली नाही.

**१०) बिल आफ राईटस्चे घटनात्मक महत्त्व :**

कन्व्हेन्शल पार्लमेंटने मेरी व विल्यम यांना राजपद देऊन पार्लमेंटचे सार्वभौमत्त्व सिद्ध झाले. पार्लमेंट कोणालाही राजा बनवू शकते किंवा त्याला पदच्युत करू शकते. पार्लमेंटने आपले सार्वभौमत्त्व सिद्ध करण्यासाठी बिल ऑफ राईटस् हा कायदा राजाराणीपुढे ठेवला. तो मंजूर करून घेतला. या कायद्याच्या तरतुदी पुढीलप्रमाणे-

*१) राजाला पार्लमेंटच्या परवानगीशिवाय नवीन कायदे करणे, जुने कायदे रद्द करणे किंवा त्याची अंमलबजावणी करता येणार नाही.*

*२) आजपर्यंत राजाने स्वतःच्या अधिकारात कायद्यांना स्थगिती दिली किंवा त्याची अंमलबजावणी केली हे कृत्य बेकायदेशीर आहे..*

*३) पार्लमेंटच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचा कर वसूल करण्याचा किंवा नवीन कर लागू करण्याचा हक्क राजाला नाही.*

*४) पार्लमेंटच्या परवानगीशिवाय राजाला सैन्य भरती करता येणार नाही.*

*५) धार्मिक बाबतीत किंवा इतर कोणत्याही बाबतीत पार्लमेंटच्या परवानगीशिवाय राजाला आयोग नेमता येणार नाही.*

*६) जामीन देणे, दंड करणे, कठोर शिक्षा देणे असा कोणताही अधिकार राजाला असणार नाही.*

*७) न्यायाधिशांची नेमणूक किंवा त्यांची निवड पार्लमेंटने ठरवून दिलेल्या पॅनेलमधूनच करावी.*

*८) एखाद्याला मोठा दंड करणे किंवा कमी करणे, मालमत्ता जप्त करणे हे अधिकार पार्लमेंटच्या किंवा कोर्टाच्या परवानगीशिवाय राजाला असणार नाहीत.*

*९)ब्रिटीश नागरिकांना पार्लमेंटची निवडणूक लढविण्याबाबत पूर्ण स्वातंत्र्य असेल.*

*१०) पार्लमेंटमधील प्रत्येक सभासदाला भाषण स्वातंत्र्य, 'चर्चेमध्ये' सहभागी होण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेल. त्याने केलेल्या भाषणावर पार्लमेंटबाहेर त्याच्यावर कोणत्याही न्यायालयात खटला चालविला जाणार नाही.*

*११) समाजामधील व कायद्यामधील त्रुटी किंवा उणिवा, दोष वारंवार बोलवावी. दूर करण्यासाठी पार्लमेंटची सभा*

*१२) ब्रिटीश प्रजेला आपल्या अडचणी, समस्या, पार्लमेंटपुढे मांडण्याचा पूर्ण हक्क आहे.*

*१३) राजाने पार्लमेंटच्या निवडणुकीमध्ये करू नये.*

*१४) प्रोटेस्टंट पंथीय लोकांना कायद्याने संरक्षण द्यावे.*

*१५) जे कॅथॉलिक आहेत किंवा ज्यांनी कॅथॉलिक कन्येशी विवाह केला आहे अशा कोणत्याही राजघराण्यातील व्यक्तीला इंग्लंडचे राजपद मिळणार नाही.*

## ॲक्ट ऑफ सेटलमेंट (१७०१ )

हा कायदा मंजूर होण्यापूर्वी राजा ठरविण्याचा अधिकार पार्लमेंटला नसे. या कायद्याने तो अधिकार पार्लमेंटला मिळाला. वैभवशाली क्रांतीनंतर पार्लमेंटने आपल्या अधिकारात विल्यम व मेरी यांना इंग्लंडचे राजपद बहाल केले. विल्यम व मेरी यांना अपत्य नसल्याने जेम्सची दुसरी मुलगी व मेरीची बहीण व्हॅनोव्हर घराण्यातील राणी अनीस इंग्लंडचे राजपद देण्याचे एकमताने ठरविण्यात आले. दरम्यान इ.स. १६९४ मध्ये मेरी व इ.स. १७०० मध्ये ॲनी राणीच्या मुलाचे निधन झाले. त्यामुळे परत इंग्लंडच्या गादीच्या वारसाचा प्रश्न निर्माण झाला. ॲनी राणीची मुलगी सोफिया हिला राजपद देण्याचे पार्लमेंटने निश्चित केले. सोफिया ही राजा जेम्स दुसरा याची नात होती. तिच्या हाती राजपद सोपविण्यासाठी पार्लमेंटने ॲक्ट ऑफ सेटलमेंट मंजूर करून घेतला. त्या कायद्याच्या पुढीलप्रमाणे-

१) ॲन राणीच्या मृत्यूनंतर इंग्लंडचा राजमुकुट व्हॅनोअरची उमराव सोफियाकडे सोपविण्यात यावा. तो तिच्याकडेच वंशपरंपरेने चालावा.

२) कोणत्याही परदेशी व्यक्तीला इंग्लंडमधील महत्त्वाचे पद देऊ नये.

३) पार्लमेंटच्या परवानगीशिवाय राजाने कोणत्याही युद्धात भाग घेऊ नये.

४) कोणत्याही परिस्थितीत राजाने पार्लमेंटच्या परवानगीशिवाय इंग्लंडबाहेर जाऊ नये.

५) पूर्वी अधिकारावर असणाऱ्या पण सध्या निवृत्ती वेतन घेत असलेल्या व्यक्तीला हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बसता येणार नाही.

६) सर्व महत्त्वाच्या गोष्टींचा निर्णय प्रिव्हिकौन्सिलमध्ये घ्यावा.

७)कोणाच्याही पदचुतीमध्ये राजाने हस्तक्षेप करू नये.

८) न्यायसंस्थेची प्रतिष्ठा व स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यात येईल.